"गॉज कापड व बॅण्डेज कापड"
या बाबीची दर निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/भांखस/गॉज कापड व बॅण्डेज कापड/दरनिश्चिती/२०२०-२१/(२४)/** कि-8556
**२०१९/** **दिनांकः-** 18 AUG 2020

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.२०/०७/२०२० रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार **"गॉज कापड व बॅन्डेज कापड"** या बाबीची **सन २०२०-२१** या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी सन २०१९-२० या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी खालील संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती दि.२०/०७/२०२० रोजीच्या बैठकीत **"गॉज कापड व बॅन्डेज कापड"** या बाबीचे सन २०१८-१९ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**१) मे. विदर्भ महारोगी सेवा मंडळ, अमरावती**

**२) मे. मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, पुणे**

**"गॉज कापड व बॅण्डेज कापड "** या बाबीचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाबीचे नाव व विर्निदेश | पॅकींगचा आकार | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १०० cm X२० m. | ३९०/- |
| २. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ९० cm X २० m. | ३५८/- |
| ३. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १००cm X १० m. | १९२/- |
| ४. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | १० cm X ४ m. | १५/- |
| ५. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | १५ cm X ४ m. | २०/- |
| ६. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ५० cm X १८ m. | १३०/- |

| अ.क्र. | बाबीचे नाव व विर्निदेश | पॅकींगचा आकार | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| ७. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ९० cm X १८ m. | २३७/- |
| ८. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १०० cm X १० m | १२०/- |

संस्थेस राखीव असलेल्या बाबींची वार्षिक उत्पादन क्षमता खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | उत्पादित वस्तुंचे नांव | मे. डॉ. मेहरु मेहता अंपगोद्वार औद्योगिक सहकारी सोसायटी मर्यादित. | मे. विदर्भ महारोगी सेवा मंडळ, अमरावती |
|---|---|---|---|
| १. | बॅन्डेज कापड | ०५.४० लाख मिटर | ०३.०० लाख मिटर |
| २. | गॉज क्लॉथ | १०.०० लाख मिटर | ०१.०० लाख मिटर |

संस्थेने उपरोक्त नमुद उत्पादन क्षमतेच्या मर्यादेत पुरवठा करावा. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई या विभागांनी उपरोक्त संस्थेस उत्पादन क्षमतेच्या प्रमाणात पुरवठा आदेश देण्याबाबत कार्यवाही करावी.

सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता दि.३०/०४/२०२१ पर्यंत राहील. गॉज कापड व बॅण्डेज कापड या बाबीसाठी जर वस्तू व सेवा कर (GST) लागू असेल, तर या बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

संस्थेनी स्वत: उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये. संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:**-मागणीपत्र मिळाल्यापासून३० दिवसाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी:**- मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकांरामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा

किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरव्रठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाचा / वस्तूचा दर्जा व गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

वरील संस्थेने शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठयाबाबतचा अहवाल वस्तूनिहाय प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, श्री जगदंबा कुष्ट निवास, "तपोवन", जिल्हा अमरावती.
२) मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, डॉ. बंदरवाला लेप्रसी हॉस्पीटल परिसर, येवले वाडी, कोंढवा बुद्रुक, पुणे- ४११ ०४८.
३) निवड नस्ती.